नाना पाटेकर : किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे उद्घाटन

# ...तर आजचा नटसम्राट वेगळ्या पद्धतीने करता आला असता

लोकमत न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** समाजकार्याला सुरुवात केली तेव्हा वेगवेगळ्या पद्धतीचे लोक वाचायला लागलो. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या घरी गेल्यानंतर त्यांच्या व्यथा जाणून घेतल्या. हाच अनुभव जर पूर्वी आला असता तर आजचा नटसम्राट वेगळ्या पद्धतीने करता आला असता, असे मत नाम फाउंडेशनचे संस्थापक ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांनी केले.

सोलापूर विद्यापीठातील सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या ९ व्या किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या उद्घाटनाप्रसंगी नाना पाटेकर बोलत होते. यावेळी व्यासपीठावर सुप्रसिद्ध अभिनेते मकरंद अनासपुरे, कुलगुरु डॉ.एन.एन.मालदार, के.एफ.आय.चे व्यवस्थापकीय संचालक आर.व्ही.गुमास्ते, महापौर शोभा बनशेट्टी, चित्रपट महोत्सवाचे संचालक वीरेंद्र चित्राव, एस.बी.यु.अ‍ॅन्ड युनिट हेड एस.एल. कुलकर्णी, कुलसचिव पी. प्रभाकर उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते चित्रपट महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. आजच्या युगात माणूस व्यस्त होत चालला आहे असे सांगत नाना पाटेकर म्हणाले की, प्रत्येकांनी स्वत:शी संवाद साधण्यासाठी कमीत कमी १० मिनिटांचा वेळ दिला पाहिजे. आपण काय चांगले काम केले आहे याचे आत्मचिंतन करा. स्वत:ला एका चौकटीत ठेवून जिवंत ममीसारखे जीवन न जगता आई-वडिलांचाही विचार केला पाहिजे.

पर्यावरणाबद्दल बोलताना नाना पाटेकर म्हणाले की, पर्यावरणाचे संवर्धन व संरक्षण करणे म्हणजे स्वत:साठी केलेले कार्य आहे. कोणतीही गोष्ट शासनाने केली पाहिजे असा विचार न करता एक जबाबदारी स्वत:ही स्वीकारावी. केवळ वरवरचे काम करुन भागणार नाही तर पर्यावरणासंबंधीची संवेदना अंतर्मनामध्ये झिरपली पाहिजे. तरुणांनी शहरापेक्षा ग्रामीण भागात जाऊन काम करावे असे आवाहन यावेळी नाना पाटेकर यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वीरेंद्र चित्राव यांनी केले. सूत्रसंचालन सुचित्रा चित्राव यांनी केले तर शेवटी आभार कुलसचिव पी. प्रभाकर यांनी मानले.



कर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे रोपाला पाणी घालून उद्घाटन करताना ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर व मकरंद अनासपुरे. सोबत डावीकडून वीरेंद्र चित्राव, आर.व्ही.गुमास्ते, कुलगुरु डॉ.एन.एन.मालदार, महापौर शोभा बनशेट्टी, एस.एल. कुलकर्णी

## निसर्ग हसू देणार नाही : अनासपुरे

◆ आज भयावह परिस्थिती निर्माण झाली आहे. एकीकडे विकासाच्या नावाखाली निसर्गाची मोडतोड सुरु आहे. ५०० वर्षांपूर्वी संत तुकाराम महाराजांनी 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे' या अभंगातून निसर्गाचे महत्त्व सांगितले होते. आज झाडे लावणे गौण आहे, ती मनापासून जोपासली पाहिजे. त्याचे संवर्धन करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. आजच्या युगात हे जर झाले नाही तर भविष्यात पाण्यासाठी संघर्ष होईल. आपण एक जागृत नागरिक म्हणून गांभीर्याने विचार केला पाहिजे. आज आपण हसत आहोत, पर्यावरणाकडे दुर्लक्ष करीत आहोत, उद्या निसर्ग तुम्हाला हसू देणार नाही. नद्यांमध्ये घाण टाकू नका, त्याची साफसफाई करा. प्लास्टिक पिशव्यांचा वापर करु नका. जास्तीत जास्त झाडे लावा व त्याचे संवर्धन करा. घरात आणि घोषणेत प्रेम न दाखवता प्रत्यक्ष कामाला लागा. स्वत:साठी नव्हे तर येणाऱ्या पिढीचा विचार करा अन्यथा भविष्यात अनर्थ होईल असे मत यावेळी प्रसिद्ध अभिनेते मकरंद अनासपुरे यांनी व्यक्त केले.

## समीर इनामदार यांना वसुंधरा मित्र पुरस्कार प्रदान



◆ सोलापुरातील धुळीची समस्या, पाण्याचे प्रदूषण, वातावरणातील बदल, वाहनांचे प्रदूषण कसे रोखावे आदी विषयावर सातत्याने लिखाण करणारे लोकमतचे उपमुख्य उपसंपादक डॉ. समीर इनामदार यांना यावेळी नाम फाउंडेशनचे संस्थापक प्रसिद्ध अभिनेते नाना पाटेकर यांच्या हस्ते वसुंधरा मित्र पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी सोलापूर विद्यापीठातील लघुपट स्पर्धेतील विद्यार्थ्यांचाही नाना पाटेकर व मकरंद अनासपुरे यांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला.